**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक 05/03/2026**

**आरोपी लोकसेवक :-** श्रीनीवास रामदास आरदवाड , वय -48 वर्ष, व्यवसाय- नोकरी , सपोफो 21 पोलीस ठाणे तुळजापूर रा.संभाजीनगर , धाराशिव ता.जि.धाराशिव.

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धाराशिव |
| **गुन्हा दाखल पोलीस ठाणे** | पोलीस ठाणे तुळजापूर , धाराशिव ता.जि.धाराशिव येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| **आलोसे यांचे नाव** | श्रीनीवास रामदास आरदवाड , वय -48 वर्ष, व्यवसाय- नोकरी , सपोफो 21 पोलीस ठाणे तुळजापूर रा.संभाजीनगर , धाराशिव ता.जि.धाराशिव. |
| **लाच मागणी रक्कम** | 15000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोड अंती 5000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले |
| **लाच स्विक्रती रक्कम** | 5000/- रुपये |
| **सापळा अधिकारी तपास अधिकारी** | श्री.बाळासाहेब मनोहर नरवटे ,पोलीस निरीक्षक ला.प्र.वि धाराशिव.<br>श्री.विजय वगरे , पोलीस निरीक्षक , ला.प्र.वि. धाराशिव |
| **लाच मागण्याचा हेतु** | यातील मुळ तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धाराशिव यांचेकडे लेखी तक्रार दिली की, त्यांना पोलीस ठाणे तुळजापूर येथे दाखल गुरन 82/2026 मध्ये कलम वाढ न करण्यासाठी व गुन्हयातील मोटार सायकल जप्त न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे आलोसे आरदवाड हे 15000 रुपये मागणी करीत आहेत. |
| **थोडक्यात माहिती** | वरील तक्रारीच्या अनुषंगाणे तक्रारीच्या पडताळणीकरीता दि.04/03/2026 रोजी तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांना पोलीस ठाणे तुळजापूर येथे पाठवून लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे आलोसे आरदवाड यांनी पोलीस ठाणे तुळजापूर येथे दाखल असलेल्या गुरन 82/2026 मध्ये कलम वाढ न करण्यासाठी व गुन्हयात मोटार सायकल जप्त न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडून 15000/- रुपयाची मागणी करुन तडजोड अंती 5000/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन ते पंचासमक्ष स्विकारले वगैरेवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक , श्रीमती माधुरी केदार कांगणे, लाप्रवि छत्रपती संभाजीनगर , मा.अपर पोलीस अधीक्षक, श्री.शशिकांत सिंगारे, लाप्रवि छत्रपती संभाजीनगर, श्री.योगेश येळापूरे , पोलीस उप अधिक्षक, लाप्रवि धाराशिव यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक बाळासाहेब मनोहर नरवटे , वय 37 वर्षे , लाप्रवि धाराशिव यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पो.ह.पाटील ,पो.अं.डोके , काझी व चापोना करडे लापवि धाराशिव यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहान करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , धाराशिव यांचेशी संपर्क करावा.

**संपर्क पत्ता** :- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव**
**संकेतस्थळ** :- 1. acbwebmail@mahapolice.gov.in
2. dysposmanabad@gmail.com
**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** :- acbmaharashtra.net
**टोल फ्रि क्रमांक** :- 1064
**दुरध्वनी क्रमांक** :- 02472-222879
**पोलीस उप अधीक्षक , लाप्रवि, धाराशिव** :- 1) 9049519833
2)9270231064

कार्यालय पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धाराशिव

**( बाळासाहेब नरवटे )**
**पोलीस निरीक्षक ,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , धाराशिव.**

Scanned with OKEN Scanner